# मेट्रो ३ : सरकत्या जिन्यासाठी युआंडा रॉयल कॉन्सोर्टियमची निवड

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गातील आरे डेपो ते दादर यादरम्यानच्या १३ स्थानकांत सरकते जिने बसवण्यासाठी युआंडा रॉयल कॉन्सोर्टिअम या समूहाची निवड करण्यात आली आहे. जायकाच्या मार्गदर्शना अंतर्गत ही निविदा प्रक्रिया पार पडली. युआंडा रॉयल कॉन्सोर्टिअम या कंत्राटदारांच्या माध्यमातून मेट्रो ३ च्या स्थानकांच्या १७६ सरकत्या जिन्यांचे आरेखन, उत्पादन, पुरवठा, स्थानक, चाचणी आणि तपासणी ही कामे करण्यात येणार आहेत. तसेच सर्वात जास्त प्रमाणात प्रवासी वाहून नेण्याची क्षमता, ऊर्जाबचत करणारे रिजनॅरेटिव्ह ड्राईव्ह, रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन अशा कामांसाठी सरकत्या जिन्यांचे आरेखन करण्यात येणार आहे. याबाबत एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी अवजड सरकते जिने ही मेट्रो ३ साठी अत्यंत महत्त्वाची यंत्रणा असल्याचे सांगत मेट्रो ३ प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी एमएमआरसीकडून विशेष प्रयत्न करण्यात येत असल्याचे स्पष्ट केले आहे.